# १०. आप्पांचे पत्र

– अरविंद जगताप

**शब्दार्थ –**

१) उपदेश – सूचना करणे.

२) कनिष्ठ – खालच्या दर्जाचे.

३) जिव्हाळा – प्रेम, आपुलकी.

४) दर्जा – गुणवत्ता.

५) मनसोक्त – मनमुराद.

६) मोहोळ – मधमाशांचे पोळे.

७) सुदैवी – भाग्यवंत.

८) ग्रंथालय – वाचनालय.

९) शुभेच्छा – शुभकामना.

१०) सर्वोत्तम – सर्वोत्कृष्ट.

११) श्रेष्ठ – उच्च दर्जाचे.

१२) हॉस्टेल – वसतिगृह.

१३) शुभेच्छा – शुभकामना.

१४) सुदैवी – भाग्यवंत.

१५) श्रेष्ठ – उच्च दर्जाचे.

१६) हॉस्टेल – वसतिगृह.

१७) सवाई गंधर्व महोत्सव – गायन, वादन आणि नृत्य असा संगीताचा त्रिवेणी संगम घडविणारा आणि देशातील विविध संगीत घराण्यांच्या कलाकारांना बहुमान मिळवून देणारा आणि जगभरातील संगीतप्रेमींना आकर्षित करणारा हा सवाई गंधर्व संगीत महोत्सव हा शास्त्रीय संगीतातला सर्वात मोठा महोत्सव म्हणून गणला जातो. भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांनी आपले संगीतातले गुरू रामभाऊ कुंदगोळकर यांच्या स्मरणार्थ 'सवाई गंधर्व महोत्सव' ची सुरुवात केली. भीमसेन जोशींच्या निधनानंतर ह्या संगीत महोत्सवाचे नाव 'सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव' असे बदलण्यात आले. 'आर्य संगीत प्रसारक मंडळातर्फे' हा महोत्सव दरवर्षी आयोजित केला जातो.

१८) सुदर्शन पटनायक– हे पुरी, ओडीसा येथील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वालुका शिल्पकार आहेत. जगन्नाथपुरीला राहणा–या एका मध्यमवर्गीय, धार्मिक कुटुंबामधे १५ एप्रिल १९७७ मध्ये त्याचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षण चालू असतांना त्यांना काही घरगुती कारणांमुळे पुढे शिक्षण घेता आले नाही. वयाच्या सातव्या वर्षापासून त्यांनी पुरीच्या

समुद्रकिना–यावर वाळूंच्या कणांतून त्यांनी विविध वालुकामूर्ती घडविल्या. सुरुवातीलाच आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्वोकृष्ट वाळूशिल्पकार हा किताब त्यांना २००८ मध्ये त्यांच्या पदार्पणातच मिळाला. कलेच्या माध्यमातून प्रसिद्धी मिळत गेल्यानंतर वाळूशिल्पात त्यांचा दबदबा निर्माण झाला. रशियाच्या समुद्रकिना–यावर बनवलेल्या त्याच्या कलाकृतीला पीपल्स चॉइस हा पुरस्कार मिळाला. पुढे त्यांना प्रचंड प्रसिद्धी मिळत गेली. तसेच त्यांना विविध पुरस्कारांनी आतापर्यंत सन्मानित करण्यात आले आहे. ओरिया, हिंदी, इंग्रजी, बंगाली भाषेवरही त्यांनी प्रभुत्त्व मिळवले. सँड इंडिया डॉट कॉम च्या माध्यमातून जगभरातील कलाकारांशी, विद्यार्थ्यांशी ते संवाद साधत असतात.

१९) बिस्मिल्लाह खान – जन्म २१ मार्च १९१६ तर मृत्यू २१ ऑगस्ट २००६. सनई हे भारतीय वाद्य जगप्रसिद्ध करण्यात सनईवादक उस्ताद बिस्मिल्ला खान यांची महत्त्वाची भूमिका आहे. बिस्मिल्ला खान यांना संगीत–नाटक अकादमीची फेलो, पद्म विभूषण, पद्मभूषण, पद्मश्री, संगीत नाटक अकादमी पुरस्कार, तानसेन शासकीय पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळाले. २००१ साली भारत सरकारने मा.बिस्मिल्लाह खान यांना सर्वोच्च असा 'भारतरत्न' पुरस्कार बहाल केला. हिंदी चित्रपट सृष्टीतही शहनाईला त्यांनी श्रेष्ठत्व प्राप्त करून दिले.

२०) डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम – वैज्ञानिक, संशोधक, शिक्षक आणि भारताचे राष्ट्रपती ह्या सर्व पदांवर कार्य केलेले एक थोर भारतीय म्हणजे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम. त्यांच्या इतरांपेक्षा वेगळ्या पद्धतीने कार्य करण्याच्या सवयींमुळे ते 'लोकांचे राष्ट्रपती' म्हणून प्रसिद्ध झाले. राष्ट्रपती पदाच्या पाच वर्षाच्या काळात त्यांनी भारतीयांच्या मनात मानाचे स्थान निर्माण केले. क्षेपणास्त्र विकासकार्यामधील 'अग्नी' क्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचणीमुळे डॉ. कलाम यांचे जगभरातून कौतुक झाले. विज्ञानाचा परम भोक्ता असणारे डॉ. कलाम मनाने खूप संवेदनशील व साधे होते. त्यांना रुद्रवीणा वाजवण्याचा, मुलांशी गप्पा मारण्याचा छंद होता. भारत सरकारने 'पद्मभूषण', 'पद्मविभूषण' व १९९८ मध्ये 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब देऊन त्यांचा सन्मान केला. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्म दिवस जगभरात जागतिक विद्यार्थी दिवस म्हणून पाळला जातो.

२१) वेरुळ–अजिंठा लेणी – औरंगाबादहून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर वेरूळ, तर ११० किलोमीटर अंतरावर अजिंठा लेणी आहेत. अजिंठा लेणी ही जागतिक वारसा स्थान म्हणून युनेस्कोने इ.स. १९८३ साली घोषित केली आहे. या लेणीला भारतातील पहिल्या जागतिक वारसा स्थळाचा मान आहे. अजिंठा लेण्यांत गौतम बुद्धाच्या विविध भावमुद्रा तसेच बौद्ध तत्त्वज्ञानाला चित्रशिल्प रूपात व्यक्त करणाऱ्या शिल्पकलेचा अद्वितीय अविष्कार पाहायला मिळतो. तिथे सहयाद्रीच्या रांगांमधील सातमाळ म्हणून ओळखल्या जाणा–या पर्वतरांगेत दोन किलोमीटर परिसरात या वेरूळ लेण्यांचा समूह विखुरलेला आहे. या साधारणत: पाचव्या ते दहाव्या शतकाच्या कालखंडात कोरण्यात आल्या आहेत. प्राचीन काळात कोरलेल्या १२ बौद्ध, १७ हिंदू आणि ५ जैन अशा एकूण ३४ लेण्या आहेत. इ.स. १९५१ साली भारत सरकारने वेरूळ लेणी हे राष्ट्रीय स्मारक असल्याचे घोषित केले आणि त्यानंतर ती भारत सरकारच्या पुरातत्त्व विभागाकडे सोपिविण्यात आली.